## समजून घेण्याचा वेडेपणा

तू यावंस, असं मला वाटणं,
आणि तू नं येणं...
वाट पाहू नकोस असं तू सांगणं,
आणि मी वाट पहाणं..
याला गम्मत म्हणावं, की जळणं..
तुझं माझ्या भावनांशी खेळणं,
की मीच वेड्यासारखं स्वतःला छळणं ?
गुंतागुंत असतेही त्यात आणि नसतेही..
म्हटलं तर सगळंच समजून-उमजून,
म्हंटलं तर आतल्या आत सलणं !
तू म्हणतोस,
समजून घेतेस एवढं, म्हणून तर टिकलंय..
तुझ्या वेडेपणात मी स्वतःला मिटलंय !
पण जर, खुंटलीच माझी ‘समज’ कधी..
आणि संपलाच वेडेपणाही..
तर ते समजून घेण्याचा वेडेपणा,
तू सुद्धा करशील का ?
याच प्रश्नाने मनाला आता पीडलंय....

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**